follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

२५ वर्षे विश्वासार्हतेची

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd. No. 72105/99 वर्ष २६ अंक ३२७ सातारा बुधवार दि.२८ ऑगस्ट २०२४ पाने ४ किंमत ५/- रूपये

### काँग्रेसचे ज्येष्ठ नेते खासदार वसंतराव चव्हाण अनंतात विलीन

**नांदेड :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, नांदेडचे खासदार वसंतराव चव्हाण यांचे काल सकाळी अल्प आजाराने निधन झाले. आज नांदेडमध्ये त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. खासदार वसंतराव चव्हाण यांच्या अंत्यसंस्कारासाठी अनेक नेते, कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी वसंतराव चव्हाण यांचे मित्र, राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, माजी मंत्री डी. पी. सावंत हे देखील या प्रसंगी उपस्थित होते.

आज त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, नितीन राऊत तसेच भाजपाचे नांदेडचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्यासह नांदेडचे स्थानिक नेते, काँग्रेस कार्यकर्ते आणि चव्हाण यांचे समर्थक उपस्थित होते.

श्वास घेण्यास त्रास होत असल्याने हैदराबादमधील किम्स हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरु होते. पण उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या जाण्याने नांदेड जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे.




## महाराष्ट्रात सरकार बदलणार ही काळ्या दगडावरची रेघ : अमोल कोल्हे

**मुंबई :** शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनीआंबेगावतालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागातील गाव वाड्या-वस्त्यांना भेटी देऊन या भागाचा दौरा केला. यावेळी तेरुंगण (ढगेवाडी) येथे उपस्थितांना मार्गदर्शन करताना कोल्हे बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, देशाचे नेतेशरद पवार(डहरीरव झुरुरी) यांनी सुरुवातीला आदिवासी बांधवांसाठी स्वतंत्र बजेट काढले, जेव्हा जेव्हा आदिवासी बांधव अडचणीत, संकटात असतील तेव्हाशरद पवारत्यांच्या मागे ठाम उभे राहिले आहेत. याची उतराई म्हणून आदिवासी बांधव हे आजपर्यंत शरद पवारांना विसरले नाहीत त्याचे उदाहरण म्हणजे आताची लोकसभा निवडणूक आहे.

आता दोन-तीन महिने राहिले आहेत. महाराष्ट्राचे हे सरकार बदलणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे असे त्यांनी या वेळी सांगितले.या दौऱ्यादरम्यान आदिवासींनी रस्ता, वीज, हिरडा, बेरोजगारी, पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणी, रेशनिंग कार्डवरती मिळणारे धान्य, नवीन रेशनिंग कार्ड फॉरेस्टमधील अडीअडचणी याबाबतच्या अडीअडचणी कोल्हे यांच्या समोर मांडल्या. या अडीअडचणी समजून घेत लवकरच यावर तोडगा काढण्यात येईल असे कोल्हे यांनी आदिवासी बांधवांना सांगितले. या वेळी डॉ. कोल्हे यांनी आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागातील तेरुंगण, राजपूर, तळेघर, फलोदे, जांभोरी, चिखली, पोखरी, डिंभे, शिनोली या गावांना भेटी देऊन येथील आदिवासी बांधवांचे प्रश्न व अनेक अडचणी समजावून घेतल्या. आदिवासी गावागावांमध्ये कोल्हे यांचा सत्कार करण्यात आला.

## चंद्रभागा धोक्याच्या पातळीकडे पूरसदृश स्थिती कायम




**पंढरपूर :** भीमा आणि नीरा खोऱ्यात पावसाचा जोर कायम आहे. वीर धरणातून मंगळवारी दुपारी चार वाजता पाण्याचा विसर्ग कमी केला, तर दुसरीकडे उजनी धरणातून चंद्रभागा नदीत पाण्याच्या विसर्गात थोडी वाढ केली आहे. हे पाणी चंद्रभागा नदीला येऊन मिळते. त्यामुळे चंद्रभागा नदी धोक्याच्या पातळीकडे पोहचली आहे. पूरसदृश स्थिती कायम आहे. शहरातील नदीकाठच्या झोपडपट्टीतील कुटुंबांना स्थलांतरित केले आहे. नदीकाठच्या रहिवाशांनी दक्ष राहावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

सोलापूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी वरुणराजाने हजेरी लावली आहे. त्यामुळे ओढे, नाले भरून वाहत आहेत. तसेच पुण्यात पावसाचा जोर कमी-जास्त होत आहे. दौंड येथून ६७ हजार क्युसेक पाणी उजनी धरणात येत आहे, तर दुसरीकडे वीर धरणातून नीरा नदीत ५५ हजार क्युसेक पाणी सोडले आहे. हे पाणी नीरा नृसिंहपूर येथे नीरा आणि भीमा नदीचा संगम होतो तेथे येते. संगमातून पुढे पाणी भीमा अर्थात चंद्रभागा नदीत जाऊन मिसळते. संगम या ठिकाणी १ लाख ३१ हजार क्युसेक वेगाने पाणी वाहत आहे, तर उजनी धरण आणि संगम येथून आलेल्या पाण्याने चंद्रभागा नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. मंगळवारी दुपारी ४ वाजता चंद्रभागा नदीतून १ लाख ३० हजार क्युसेक पाणी वाहत आहे. सोमवारी सोडलेले पाणी मंगळवारी नदीला आले आहे. त्यामुळे सर्व घाटांच्या पायऱ्यांवर पाणी आले आहे.

शहरातील नदीकाठच्या झोपडपट्टीतील रहिवाशांचे स्थलांतर करण्यात आले आहे. तसेच जर पाण्याची पातळी रात्रीतून वाढली, तर इतर ठिकाणच्या नागरिकांना स्थलांतरित करण्यासाठी पालिकेने नियोजन केले आहे. शहरात आणि विशेष करून नदीकाठच्या भागात पालिकेने दक्ष राहण्याचे आवाहन केल्याची माहिती पालिकेचे उपमुख्याधिकारी ड. सुनील वाळुजकर यांनी दिली आहे.

दरम्यान, या आधीदेखील पूरसदृश स्थिती निर्माण झाली होती. मात्र, त्या वेळेस पाटबंधारे विभागाने योग्य नियोजन केल्याने पुराचे संकट टळले होते. सध्यादेखील पुण्यातून उजनीत येणारा विसर्ग बघून नियोजन केले जात आहे. असे असले, तरी नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## कोल्हापूर अँटी करप्शनच्या पोलीस उपाधीक्षक वैष्णवी पाटील यांनी स्वीकारला कार्यभार

**कोल्हापूर :** कोल्हापूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपाधीक्षक म्हणून गेली दोन वर्ष सरदार नाळे हे कार्यभार सांभाळत होते. सरदार नाळे यांची मुंबईत बदली झाल्यानं या ठिकाणी अविनाश पोवार यांची नियुक्ती झाली होती तर वैष्णवी पाटील यांची सांगलीच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडं पोलीस उपाधीक्षक म्हणून नियुक्ती झाली होती.

मात्र अविनाश पोवार यांनी नियुक्तीनंतरही आपला कार्यभार स्वीकारला नसल्यानं लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक गजानन राठोड यांनी पोवार यांची नियुक्ती मुख्यालयात झाली आहे, तर वैष्णवी पाटील यांची कोल्हापूरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस उपाधीक्षक पदी नियुक्तीचे आदेश काढलेत. आज वैष्णवी पाटील यांनी पोलीस उपअधीक्षक म्हणून कार्यभार स्वीकारला. यापूर्वी त्यांनी कोल्हापूर जिल्ह्यात पोलीस उपनिरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणूनही काम पाहिले.




## टेंभू सेक्स रॅकेट प्रकरणाची व्याप्ती वाढली ; आणखी दोघांना अटक

**कराड :** कराड तालुक्यातील टेंभू येथील अनाथ आश्रमाच्या नावाखाली सुरू असलेल्या सेक्स रॅकेट प्रकरणाची व्याप्ती वाढली आहे. याप्रकरणी पोलिसांनी तयार केलेल्या तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या विशेष पथकाने तपासाला गती दिली आहे. या सेक्स रॅकेट प्रकरणात पोलिसांनी आणखी दोघांना अटक केली असून आजवर या गुन्ह्यात चौघांना अटक झाली आहे.

पोलिसांकडील माहिती अशी, टेंभू येथे अनाथ आश्रमाच्या नावाखाली महिलेस तिच्या असाह्यतेचा गैरफायदा घेऊन तिला जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडण्यात आले होते. या सेक्स रॅकेट प्रकरणात फिर्याद दाखल झाल्यानंतर पोलिसांनी आश्रम चालक महिलेसह वाल्मीक महादेव माने वय ४५, रा. म्हासोली ता. कराड या संशयिताला अटक केली होती. त्यानंतर या प्रकरणाची राज्यात चर्चा सुरू झाली. जिल्हा पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी याप्रकरणी कराड पोलिसांना सखोल तपास करून कारवाईचे आदेश दिले होते. पोलीस उपाधीक्षक अमोल ठाकूर, कराड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप या अधिकाऱ्यांनी वरिष्ठ तीन अधिकाऱ्यांचे विशेष तपास पथक तयार करून या प्रकरणाच्या तपासाला गती दिली.



## ज्येष्ठ अभिनेत्री सुहासिनी देशपांडे यांचे निधन, मराठी सिनेसृष्टीवर शोककळा

**मुंबई :** मराठी सिनेसृष्टीतून एक दु:खद बातमी समोर येत आहे. मराठी सिनेसृष्टीतील सुप्रसिद्ध खलनायिका सुहासिनी देशपांडे काळाच्या पडद्याआड गेल्या आहेत. आपल्या दमदार अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांच्या अढळ स्थान निर्माण करणाऱ्या सुहासिनी यांचं निधन पुण्यातील राहत्या घरी झालं आहे.

त्यांच्या पार्थिवावर उद्या (२८ ऑगस्ट) पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. सुहासिनी देशपांडे ह्या मराठी आणि हिंदी सिनेसृष्टीतील एक प्रसिद्ध अभिनेत्री असून त्यांनी आपल्या ७० वर्षांच्या सिनेकरियरमध्ये १०० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले आहे. सुहासिनी यांनी वयाच्या १२ व्या वर्षी फिल्म इंडस्ट्रीमध्ये डेब्यू केलं होतं.

सुहासिनी यांनी 'चिरंजीव', 'वारसा लक्ष्मीचा', 'आई शप्पथ', 'मंडळी तुमच्यासाठी कायपण', 'आम्ही दोघे राजा राणी', 'माहेरचा आहेर', 'धोंडी' अशा अनेक हिट चित्रपटांमध्ये त्यांनी काम केले आहे. २०११ साली रिलीज झालेल्या अजय देवगणच्या 'सिंघम' चित्रपटातही सुहासिनी यांनी काम केलं होतं. चित्रपटात त्यांनी काजल अग्रवालच्या (काव्या)च्या आजीची भूमिका साकारली होती.

शिवाय, सुहासिनी यांचं मराठी रंगभूमीशी देखील अतूट नातं होतं. मराठी रंगभूमीवर त्यांनी अनेक लोकप्रिय नाटकांमधून प्रेक्षकांचे निखळ मनोरंजन केले. 'तुझं आहे तुझ्या पाशी', 'कथा अकलेच्या कांद्याची', 'बेल भंडार', 'सुनबाई घर तुझंच आहे', 'राजकारण गेलं चुलीत', 'चिरंजीव आईस', 'सासूबाईंचं असंच असतं' व 'लग्नाची बेडी' अशा नाटकांचे हजारो प्रयोग त्यांनी केले आहेत. रंगभूमीवरील कामगिरीबद्दल सुहासिनी यांना २०१५ साली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पुणे शाखेतर्फे जयंतराव टिळक स्मृती जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. दरम्यान, सुहासिनी देशपांडे यांच्या निधनामुळे मराठी मनोरंजनसृष्टीवर शोककळा पसरली सोशल मीडियावर त्यांचे चाहते श्रद्धांजली वाहत आहेत.

### जयंत पाटील उद्या राजकोट किल्ल्यावर जाणार

**मुंबई :** सिंधुदुर्गमधील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा अवघ्या आठ महिन्यामध्ये कोसळल्याने त्यावर आता राजकीय प्रतिक्रिया उमटत असल्याचं दिसतंय. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आता घटनास्थळी जाणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे घाईगडबडीत केलेले अनावरण हे स्वराज्याच्या स्वाभिमानाला ठेच पोहचणारे असल्याची खंत जयंत पाटलांनी व्यक्त केली आहे.

## जांबोरी मैदानात देवेंद्र फडणवीस तर टेंभीनाक्याच्या दहीहंडीत मुख्यमंत्री शिंदेंची उपस्थिती

**मुंबई :** आज सर्वत्र मोठ्या उत्साहात दहीहंडीचा सण साजरा केला जात आहे. वेगवेगळी गोविंदा पथके जास्तीत जास्त थर लावण्यास सज्ज झाली आहेत. दरवर्षीप्रमाणे टेंभीनाका येथील मानाची हंडी फोडण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थिती लावली आहे. तर मुंबईच्या प्रसिद्ध जांबोरी मैदानात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजप प्रदेशाध्यक्ष आशिष शेलार उपस्थित होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज मुंबई आणि परिसरातील विविध दहिहंडी कार्यक्रमांना लावणार हजेरी लावणार आहेत. याची माहिती त्यांच्या संपर्क कार्यालयाकडून देण्यात आली आहे. टेंभी नाका दहीहंडी उत्सवाला उपस्थित राहिल्यानंतर ते ठाणे, घाटकोपर, कुर्ला, मागाठाणे, कांदिवली, मिरारोड पुन्हा ठाणे अशा विविध ठिकाणी दहीहंडी उत्सवाला उपस्थित राहतील.

शिंदे गटाचे आमदार प्रकाश सुर्वे यांनी मागाठाणे दहीहंडी आयोजित केली आहे. या दहीहंडीला नृत्यांगना गौतमी पाटीलने हजेरी लावली होती. यावेळी ती विविध गाण्यांवर थिरकल्याचे पाहायला मिळाले. भांडुप मध्ये जय जवान पथकाकडून नऊ थरांची सलामी दिलेली आहे. चार एके लावून जय जवान पथकाने ही नऊ थरांची सलामी दिली. भांडुपमध्ये मनसेच्या दहीहंडीमध्ये जय जवान पथकाने हे थर लावले आहेत.

**ठाकरेंच्या बालेकिल्ल्यात भाजपची दहीहंडी**

शिवडी विधानसभेतील ठाकरेंचा बालेकिल्ला असलेल्या लालबाग येथे भाजपने यंदा पुन्हा दहीहंडीचे आयोजन केले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजप मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांच्या सह मराठमोळे सेलिब्रिटींनी याठिकाणी हजेरी लावली. विशेष म्हणजे भाजपच्या बड्या नेत्यांच्या पोस्टरसोबत याठिकाणी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेही बॅनर्स झळकत आहेत.

## आशा सेविका, गटप्रवर्तकांच्या अनुदानासंबंधी शासनाचा आदेश

### १ एप्रिल २०२४ पासून अनुदान लागू

**मुंबई :** आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांच्या कामाचे स्वरूप लक्षात घेता कर्तव्य बजावत असताना अपघाती मृत्यू झाल्यास रु.१०.०० लाख व कायमस्वरुपी अंपगत्व आल्यास रु.५.०० लाख रकमेचे सानुग्रह अनुदान लागू करण्यास काही दिवसांपूर्वीच मान्यता देण्यात आली होती. या संदर्भातील महाराष्ट्र शासनाचा आदेश निर्गमित करण्यात आला आहे. १ एप्रिल, २०२४ पासून हा निर्णय लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना सानुग्रह अनुदान लागू करण्यासाठी प्रति वर्ष अंदाजित रु.१.०५ कोटी इतका आवर्ती निधी मंजूर करण्यात आला आहे. यासाठी आवश्यक असणारा निधी आगामी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे. आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांच्या कामाचे स्वरूप



विचारात घेवून आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांचा कर्तव्य बजावत असताना अपघाती मृत्यू आल्यास रु.१०.०० लक्ष व कायमस्वरुपी अंपगत्त्व आल्यास रु.५.०० लक्ष इतके सानुग्रह अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

आरोग्य यंत्रणा, सेवाभावी संस्था व ग्रामस्थ, समाजातील अन्य घटक यांमध्ये आरोग्यासंदर्भात जागरुकता, सुसंवाद, समन्वय, प्रोत्साहन, निर्माण करण्याच्या दृष्टीने आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक महत्वपूर्ण सामाजिक दुवा म्हणून कार्यरत आहेत. राज्यातील आशा स्वयंसेविकांचा माता आरोग्य, बाल आरोग्य, कुटुंब नियोजन इत्यादी कारणांसाठी नियमित गृहभेटी देणे, माता व बालकांना मार्गदर्शन करणे, रुग्णांना प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय येथे संदर्भीत करणे अशा प्रकारची कर्तव्ये बजावावी लागतात. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत आशा स्वयंसेविका योजना राबविण्यात येत आहे. आशा सेविका ही गावातील स्थानिक रहिवासी असल्याने व तिला स्थानिक भाषा अवगत असल्याने गावाच्या आरोग्य विषयक अडचणी समजून घेण्यास व नेतृत्व करुन गावपातळीवरील समस्या सोडविण्याकरिता आशा स्वयंसेविकेकडून महत्वपूर्ण योगदान अपेक्षित आहे. यादृष्टीने महाराष्ट्र राज्यातील १५ आदिवासी जिल्हे व ३१ बिगर आदिवासी जिल्ह्यांत आशा स्वयंसेविका कार्य करते. आशासेविकांना शासन मानधन देते.

### आशा सेविका गटप्रवर्तकांची राज्यातील संख्या

सध्या राज्यात ७५ हजार ५७८ आशा स्वयंसेविका आणि ३६२२ गटप्रवर्तक कार्यरत असून त्या आरोग्यासंदर्भात महत्त्वपूर्ण जबाबदारी सांभाळतात. हे करताना अपघाती मृत्यू आल्यास किंवा अपंगत्व आल्यास त्यांना आर्थिक सहाय्य व्हावे यासाठी हा निर्णय घेण्यात आला.

# उचलली जीभ लावली...

गेल्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला उत्तर प्रदेश, राजस्थान, हरयाणा, महाराष्ट्र या राज्यांत अपयश येण्यामागे शेतकऱ्यांची नाराजी हे एक महत्त्वाचे कारण होते. तेव्हापासून भाजपने शेतकऱ्यांच्या बाबतीत सबुरीचे धोरण घेतले आहे. त्यातच हरयाणासारख्या शेतीप्रधान राज्यांत विधानसभेची निवडणूक सुरू आहे. महाराष्ट्र आणि झारखंडची निवडणूक आगामी तीन महिन्यांत होणार आहे. त्यामुळे प्रत्येक पक्ष या काळात वाद होणार नाही आणि काही अंगलट येणार नाही, याची दक्षता घेत असताना कंगना राणावतने मुक्ताफळे उधळली आहेत. एखाद्या क्षेत्रात आपल्याला गती असली, म्हणजे सर्वंच क्षेत्रात आपण नाक खुपसावे, असा त्याचा अर्थ होत नाही; परंतु कंगनासारख्यांना ते कोण सांगणार ? पक्षाबरोबर आपणही तोंडघशी पडायचे, असे तिने जणू ठरवले आहे. मुंबईत बेकायदेशीर बांधकामाचा मुद्दा असो, की शिवसेनेच्या ठाकरे गटाबरोबर घेतलेला पंगा; वाद आणि कंगणा हे एक नाते तयार झाले आहे. शेतकऱ्यांविषयी मागे वादग्रस्त टिप्पणी केल्याचा राग केंद्रीय राखीव दलातील एका महिलेने कंगनाच्या श्रीमुखात लगावून व्यक्त केला होताच. ते चुकीचे असले, तरी 'बातोंकी भाषा न समजनेवालोंको लातोकी भाषासे समझाना पडता है' हा हिंदी चित्रपटातील संवाद लागू होतो. आताही तिने शेतकऱ्यांविषयी केलेल्या वादग्रस्त टिप्पणीने तिला खुनाची धमकी दिली असेल, तर ते चुकीचे आहे; परंतु याचा अर्थ तिने काहीही बोलावे आणि इतरांनी ते निमूटपणे सहन करावे असा होत नाही. पुणेरी अनुल्लेखने अशांचे फावते, हे समजून घ्यायला हवे. हरयाणा विधानसभेच्या निवडणुकीत कंगनाच्या वक्तव्यामुळे फटका बसू शकतो, हे लक्षात आल्यानंतर भारतीय जनता पक्षाने तिच्या वक्तव्यापासून स्वतःला दूर ठेवून तिला समज दिली असली, तरी पूर्वीचा अनुभव लक्षात घेता तिला त्याचा किती फरक पडतो, हे पाहावे लागेल. पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, राजस्थान आदी राज्यातील शेतकऱ्यांनी आपल्या मागण्यांबाबत सुरू केलेल्या आंदोलनादरम्यान नोव्हेंबर २०२१ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीन वादग्रस्त कृषी कायदे मागे घेण्याची घोषणा केली होती, त्यानंतर शेतकऱ्यांनी ११ डिसेंबर २०२१ रोजी आंदोलन मागे घेतले होते; मात्र सरकारने शेतकरी संघटनांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता होत नसल्याने शेतकऱ्यांनी पुन्हा दिल्लीकडे मोर्चा काढण्याची घोषणा केली असून आता शेतकरी आंदोलनाच्या दुसऱ्या टप्प्यात शंभू सीमेवर मोर्चा काढणार आहेत. फेब्रुवारीमध्ये सुरू असलेल्या आंदोलनाला ३१ ऑगस्टला २०० दिवस पूर्ण होणार आहेत. या काळात वेळोवेळी काही नेत्यांकडून आक्षेपार्ह विधाने करून वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न केला जात आहे. १२ ऑगस्ट रोजी झालेल्या शेवटच्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने पंजाब आणि हरियाणा सरकारला सीमा अंशतः खुली करण्याचे निर्देश दिले होते आणि शंभू सीमेवर आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना रस्त्यावरून ट्रॅक्टर आणि ट्रॉली हटवण्यास सांगितले होते. असे असूनही, २१ ऑगस्ट आणि २५ ऑगस्ट रोजी पंजाब पोलिस, शेतकरी आणि हरियाणाचे वरिष्ठ अधिकारी यांच्यात पटियाला येथे झालेल्या बैठका अनिर्णित राहिल्याने सीमा उघडण्याचे काम तूर्तास स्थगित करण्यात आले आहे.

एकीकडे ही स्थिती असताना शेतकरी पुन्हा आंदोलनाच्या तयारीत आहेत. त्यातून मार्ग काढण्यासाठी केंद्र सरकारने काहीच प्रयत्न केले नाहीत; परंतु सर्वोच्च न्यायालयाने बहुसदस्यीय समिती स्थापन करण्याबरोबरच शेतकऱ्यांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी पुढील सुनावणीची तारीख २ सप्टेंबर निश्चित केली आहे. दुसरीकडे ३१ ऑगस्टला शंभू बॉर्डरसह तीन ठिकाणी निदर्शने करण्याची रणनीतीही शेतकरी नेत्यांनी आखली आहे. देशातील शेतकरी कर्ज आणि आर्थिक संकटामुळे सातत्याने आत्महत्या करत असताना शंभू सीमेवर धरणे आंदोलनात आतापर्यंत २६ शेतकऱ्यांचा मृत्यू झाला आहे. २२ ऑगस्ट रोजी लुधियानामधील घुंघराना गावातील एका शेतकरी कुटुंबातील तीन सदस्यांनी लुधियाना-धुरी रेल्वे मार्गावर गाडीसमोर उडी मारून आत्महत्या केली. अशा परिस्थितीत आंदोलक शेतकरी आणि केंद्र सरकार यांच्यात तणावपूर्ण परिस्थिती असताना भाजप खासदार कंगनाने शेतकरी आंदोलनाबाबत केलेल्या वक्तव्यामुळे संताप व्यक्त केला जात आहे. कंगनाने एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत, सरकारने कठोर पावले उचलली नाहीत, तर शेतकऱ्यांच्या आंदोलनात पंजाबचे रूपांतर बांगला देशात होईल. तीन रद्द केलेल्या कृषी कायद्यांविरोधात शेतकऱ्यांच्या आंदोलनादरम्यान मृतदेह लटकवले जात होते आणि बलात्कार होत होते.'' असे सांगितले. कंगनाच्या या वादग्रस्त वक्त्वाचे पडसाद उमटले. विरोधी पक्षांच्या हाती आयते कोलित मिळाले. त्यामुळे भाजपने कंगनाच्या वक्तव्यापासून दूर राहून तिला धोरणात्मक मुद्द्यांवर बोलण्याचा अधिकार नसल्याचे म्हटले आहे. शेतकरी आंदोलनामुळे परिसरातील रहिवाशांचीही मोठी गैरसोय होत असून शासनाच्या प्रतिष्ठेलाही धक्का बसत आहे. त्यामुळे हा प्रश्न लवकरात लवकर सोडवणे सर्व पक्षांच्या हिताचे आहे. आता या वर्षी हरियाणा, झारखंड, महाराष्ट्र आणि जम्मू-काश्मीरमध्ये निवडणुका असल्याने सरकारने शेतकऱ्यांचे ऐकले, तर त्याचा फायदा होऊ शकतो; परंतु त्याबाबत सरकारची भूमिका आडमुठेपणाची आहे. त्यातच सरकारी पक्षाचे खासदार अशी मुक्ताफळे उधळतात. चीन आणि अमेरिकेसारख्या विदेशी शक्ती भारतात काम करतात, असा दावाही कंगनाने केला होता.

कंगना आपल्या वक्तव्यांमुळे अनेकदा वादात सापडली आहे. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत भाजपने तिला हिमाचल प्रदेशातील मंडी मतदारसंघातून लोकसभेचे तिकीट दिले होते. तिथून ती खासदार बनली आहे. तीन कृषी कायद्यांबाबत शेतकरी आंदोलनादरम्यान कंगनाच्या अनेक विधानांवरून वाद निर्माण झाला आहे. खासदार झाल्यानंतर दिल्लीत येत असलेल्या कंगनाला मोहाली विमानतळावर महिला हवालदाराने थप्पड मारली होती.

कुलविंदर कौर नावाच्या महिला हवालदाराने त्याचे समर्थन करताना सांगितले होते, की कंगनाने शेतकरी आंदोलनादरम्यान केलेल्या वक्तव्याचा राग आला होता. शेतकरी आंदोलनादरम्यान आणि त्यानंतरही अनेक प्रसंगी कंगना तिच्या वक्तव्यांमुळे चर्चेत आली होती. ८८ वर्षीय महिला शेतकरी महिंदर कौर पंजाबच्या शेतकऱ्यांसोबत झेंडा घेऊन कूच करताना दिसल्या. महिंदर कौरच्या या फोटोनंतर 'सोशल मीडिया'वर त्यांची तुलना शाहीन बाग आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या बिल्किस दादीशी करण्यात आली. त्या वेळी कंगनाने बिल्किस आणि महिंदर कौर या दोघींचे एकत्र फोटो ट्विट करून टोमणा मारला होता, हा हा. ही तीच आजी आहे जिचा टाईम मासिकाच्या १०० प्रभावशाली व्यक्तींच्या यादीत समावेश करण्यात आला होता... आणि या १०० रुपयांना उपलब्ध आहेत. कुलविंदर त्यामुळेच संतापली होती. ती स्वतः आणि तिची आईदेखील शेतकरी आंदोलनात सहभागी झाली होती. कंगणना प्रताप (!)इथेच संपत नाही. संसदेच्या अधिवेशनादरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शिवाच्या चक्रव्यूह आणि महाभारताच्या कथेचा उल्लेख केला होता. कंगनाने त्यावर राहुल गांधीं ड्रग्ज घेत असून त्यांची चाचणी केली पाहिजे, असे वादग्रस्त वक्तव्य केले होते. तिने जुलै महिन्यात शंकराचार्यांवर प्रश्न उपस्थित केले होते. त्याअगोदर कंगना म्हणाली, होती की भारताला १९४७ साली भीक मागून स्वातंत्र्य मिळाले आणि देशाला खरे स्वातंत्र्य २०१४ साली मिळाले. भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळाले. प्रदीर्घ लढा आणि संघर्षानंतर हे स्वातंत्र्य मिळाले, तर २०१४ मध्ये मोदी पहिल्यांदाच मोदी भारताचे पंतप्रधान झाले. कंगनाच्या या वक्तव्यानंतरही मोठा वाद निर्माण झाला होता. कंगनाने चित्रपट अभिनेत्री तापसी पन्नू आणि स्वरा भास्कर यांच्यावर केलेली टिप्पणी 'सोशल मीडिया'वर चर्चेत आली होती. एका टीव्ही चॅनलला दिलेल्या मुलाखतीत कंगनाने दोन्ही अभिनेत्रींचे वर्णन बी-ग्रेड अभिनेत्री असे केले होते.

कंगनाच्या शेतकऱ्यांबाबतच्या वक्तव्यानंतर काँग्रेस आणि आम आदमी पक्षांसारख्या अनेक विरोधी पक्षांना भाजपवर जोरदार प्रहार करण्याची संधी मिळाली आहे. पंजाबमध्ये आम आदमी पक्षाचे सरकार आहे. तेथून मोठ्या संख्येने शेतकरी आंदोलनात उतरले होते. याशिवाय येत्या काही दिवसांत हरियाणात विधानसभा निवडणुका होणार असून, येथील शेतकऱ्यांनीही विविध मागण्या घेऊन आंदोलन सुरू केले आहे. काँग्रेसच्या प्रवक्त्या सुप्रिया श्रीनेत यांनी पत्रकार परिषदेत केंद्रातील सत्ताधारी भाजपला कंगनाने मांडलेल्या अमेरिका आणि चीनबाबत भूमिका स्पष्ट करावी आणि चुकीची असेल, तर असे बोलणाऱ्याला पक्षातून काढून टाका, अशी मागणी केली आहे. शेतकऱ्यांवर अशा प्रकारची टिप्पणी कोणीही केली नाही आणि 'हे पक्षाचे विधान नाही' एवढेच सांगून भाजप सुटू शकत नाही. अशा वेळी कंगनाच्या वक्तव्यानंतर पहिल्यांदाच भाजपने तिला जाहीरपणे इतक्या कडक भाषेत इशारा दिला आहे. त्याचा तिच्यावर किती परिणाम होईल, याबाबत साशंकता आहे.




## तासगावातील रथोत्सव मार्गाची पोलीस अधीक्षकांकडून पाहणी

**तासगाव :** तासगाव येथील गणेशोत्सव जगप्रसिद्ध आहे. यंदाचा रथोत्सव ८ सप्टेंबर रोजी साजरा होत आहे. या दिवशी रथातून गणरायाची मिरवणूक काढली जाते. या रथोत्सवास लाखो भाविकांची उपस्थिती असते. अशावेळी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासन व अन्य प्रशासन दिवस रात्र झटत असतात. या गणेशोत्सवातील रथोत्सव मार्गाची पाहणी आज पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांनी केली.

यावेळी, पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांनी रथ व रथोत्सव मार्गाची पाहणी केली तसेच, रथोत्सवाबाबत श्री गणपती पंचायतन देवस्थानचे व्यवस्थापक तसेच तहसीलदार अतुल पाटोळे, प्रशासक तथा मुख्याधिकारी पृथ्वीराज पाटील यांच्याकडून आढावा घेतला. यावेळी, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याबाबत सूचना दिल्या.

यावेळी, गणपती पंचायतन देवस्थानच्या वतीने पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांचे स्वागत करण्यात आले. रथाची व रथोत्सव मार्गाची पाहणी करताना अतिरिक्त पोलीस अधीक्षक रितू खोकर, पोलीस उपाधीक्षक सचिन थोरबोले, पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघ उपस्थित होते.

## कराड दक्षिणच्या सर्वांगीण प्रगतीसाठी साथ द्या : डॉ. अतुल भोसले



**कराड :** भाजपा महायुती सरकारच्या माध्यमातून कराड दक्षिणमध्ये विविध विकासकामांसाठी गेल्या अडीच वर्षांत तब्बल ७०० कोटींहून अधिक विकासनिधी आणला आहे. या माध्यमातून अनेक विकासकामे मार्गी लागली असून, बहुतांशी प्रगतीपथावर आहेत. येत्या काळात कराड दक्षिणच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मी कटीबद्ध असून, यासाठी आपण सर्वांनी भक्कम साथ द्यावी. येत्या काळात आपल्या सेवेसाठी मी सदैव तत्पर असून; तुमच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, अशी ग्वाही भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ. अतुल भोसले यांनी दिली. कराड दक्षिणमधील मुंबईस्थित रहिवाशांच्या भव्य मेळाव्यात ते बोलत होते.

भाजपा कराड दक्षिणच्यावतीने नवी मुंबईतील गुजरात भवन सभागृहात कराड दक्षिणमधील मुंबईस्थित रहिवाशांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. डॉ. अतुल भोसले यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करुन मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. या मेळाव्याला भरपावसाही मुंबईकरांनी प्रचंड गर्दी केली होती.

यांप्रसंगी मुंबईस्थित रहिवाशांशी संवाद साधताना डॉ. भोसले म्हणाले, अनेक वर्षांपूर्वी कामाच्या शोधात आपल्या भागातील अनेक ग्रामस्थ मुंबईला आले. त्याकाळी कुणाचेही पाठबळ नसताना त्यांनी मुंबईत कष्टाने जीवन जगून, स्वतःची ओळख निर्माण केली. आपल्या या कष्टाळू वृत्तीला माझा सलाम आहे. मुंबईत स्थायिक झाला तरी आपण आपली गावाकडची नाळ तुटू दिलेली नाही. किंबहुना गावाकडच्या प्रत्येक अडचणीच्या काळात तुम्ही मदतीसाठी सदैव पुढे असता, ही दानशूरतेची भावना अतिशय मोलाची आहे.

भाजपा महायुती सरकारच्या माध्यमातून गेल्या अडीच वर्षात जवळपास ७०० कोटींचा विकास निधी आला आहे. दक्षिणमधील २२७ किलोमीटरच्या पाणंद रस्त्यांसाठी ग्रामविकास खात्याच्या माध्यमातून ४५ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. तसेच वाकुर्डे योजनेसाठी सरकारला कायमस्वरुपी धोरण ठरविण्यासाठी भाग पाडून, कृष्णा कारखान्याच्या माध्यमातून नियमित थकीत रक्कम भरण्याची व्यवस्था केल्याने त्याचा आपल्या भागातील लोकांना मोठा लाभ होत आहे.

कृष्णा उद्योग समूहाच्या माध्यमातून आपल्या भागातील हजारो लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. येत्या काळातही हा प्रयत्न कायम ठेऊन; महिला, ज्येष्ठ नागरिक, युवकांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आपल्या सर्वांनी मला भक्कम पाठबळ द्यावे, असे आवाहन डॉ. भोसले यांनी केले.

नवी मुंबई महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती सदस्य संपतराव शेवाळे म्हणाले, डॉ. अतुलबाबांनी कराड दक्षिणमधील गावागावात शासनाच्या माध्यमातून मोठा निधी आणून अनेक विकासकामे साकारली आहेत. शासनाच्या अनेक योजनांचा लाभ देण्यासाठी ते आपल्या भागात गावोगावी शिबीरे घेत आहेत. त्यामुळे अशा कार्यक्षम नेतृत्वाला यंदा विधानसभेत संधी देण्याची गरज आहे. तेव्हा आता डॉ. अतुलबाबांना आमदार करण्यासाठी आपण सर्व मुंबईकरांनी मनाशी खूणगाठ बांधून पूर्ण तयारीनिशी कामाला लागावे.

यावेळी य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्रीरंग देसाई, म्हारुगडेवाडीचे उपसरपंच अजित म्हारुगडे, जगन्नाथ म्हारुगडे, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव, संदीप देसाई, सुरेश वाघमारे, जयवंत माटेकर यांची भाषणे झाली.

## वाई इनरव्हील क्लबच्या अध्यक्षपदी सौ सुनीता सतीश पानसे



**वाई :** येथील इनरव्हील क्लबच्या अध्यक्षपदी सौ सुनीता पानसे तर सचिवपदी सरिता भणगे यांचा पदग्रहण समारंभ उत्साहात पार पडला.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून रोटेरियन डिस्ट्रिक्ट गव्हर्नर स्वाती हेरकळ, ज्येष्ठ सदस्या पीडीसी रोहिणी वैद्य, तसेच मावळत्या अध्यक्षा भावना गायकवाड, सचिव तेजल सावंत, रेखा चिरगुटे यांची प्रमुख उपस्थित होती.

प्रारंभी मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन करून गणेश वंदनेने कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. मावळत्या अध्यक्षा भावना गायकवाड यांनी आपल्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत केलेल्या सेवाकार्याचा आढावा घेतला. सचिव तेजल सावंत यांनी अहवाल सादर केला.

नवनिर्वाचित अध्यक्षा सुनीता पानसे यांनी मावळत्या अध्यक्षा भावना गायकवाड यांच्याकडून पदभार स्वीकारला, तर सचिवपदाचा कार्यभार सरिता भणगे यांनी स्वीकारला, तसेच उपाध्यक्ष सरिता जमदाडे, ट्रेझर तेजल सावंत, आयएसओ रुपाली शिंदे,एडिटर रुपाली मोरे व ,सीसी संयुक्ता देवकूळे यांनी २०२४-२५ वर्षाकरिता पदभार स्वीकारला. यावेळी कार्यकारिणी सदस्या रेखा चिरगुटे, निता मुळे, प्राजक्ता पवार, पल्लवी मेणबुदले, भाग्यश्री सरडे व दिपाली सावंत यांचे ही स्वागत केले.यावेळी नूतन अध्यक्षा सुनीता पानसे यांनी इंटरनॅशनल इनरव्हील थीम मानवतेचे हृदयस्पंद याबद्दल माहिती देत क्लबच्या सर्व पदाधिकारी,एक्झिक्युटिव्ह कमिटी, क्लब मेंबर्स यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त केली.

# कोयना धरणग्रस्त आंदोलनाची दिशा लवकरच जाहीर करणार : चैतन्य दळवी

**पाटण :** कोयना धरणासाठी ज्या धरणग्रस्तांनी आपल्या सर्वस्वाचा त्याग केला त्या धरणग्रस्तांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यास शासन पुरते अपयशी ठरले आहे. आजवर अनेक आंदोलने केली मात्र तरीही शासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. भविष्यातील आंदोलनाची लवकरच दिशा जाहीर करून शासनाला योग्य तो जाब विचारणार असल्याचा इशारा धरणग्रस्तांचे नेते चैतन्य दळवी यांनी दिला

कोयनानगर तीन मंदिर येथे कोयना धरणग्रस्तांचा मेळावा पार पडला त्यावेळी ते बोलत होते.

मेळावामध्ये धरणग्रस्तांच्या प्रलंबित प्रश्नावर चर्चा करण्यात आली आणि आतापर्यंत झालेल्या कामांचा आढावा घेण्यात आला. त्यामध्ये सातारा, सांगली जिल्हामध्ये जमीन मागणी अर्ज केलेल्या पात्र खातेदारांना लवकरात लवकर जमीन वाटप होणे, गोकुळ, रासाटी, हेळवाक, शिवंदेश्वर या गावांना खास बाब म्हणून पुनर्वसनाचे लाभ देणे, पुनर्वसित गावांना नागरी सुविधा दिल्या जात नाहीत त्यांना नागरी सुविधा देण्यात याव्या, शौचालय, घर बांधणी अनुदान लवकरात देण्यात यावे, प्रकल्पग्रस्त दाखले देणे बंद केले आहे ते चालू करणे आदी प्रलंबित गोष्टी लवकरात लवकर चालू कराव्यात अन्यथा येत्या काही दिवसात सातारा आणि सांगली जिल्हाधिकारी कार्यालया समोर आंदोलन पुकारले जाईल असा इशारा दिला.



कोयनानगर येथे कोयना धरणग्रस्तांच्या प्रश्नांवर धरणग्रस्तांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता त्यावेळी बोलताना चैतन्य दळवी.

कोयना धरणग्रस्तांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत गेली सहा वर्ष कोयना धरणग्रस्त वेगवेगळ्या मार्गाने आंदोलन उपोषण मोर्चे करून आपला न्याय हक्क शासनाकडे मागत आहेत. मागील वर्षी आंदोलन केल्यानंतर सातारा आणि सांगली जिल्ह्यामध्ये जमीन पसंतीचा कार्यक्रम राबवला गेला आणि त्यातून जवळजवळ १२०० अर्जदारांनी जमीन मागणीसाठी अर्ज केले. मुळात ४५ दिवसांमध्ये जमीन मागणी अर्जावर कार्यवाही होणे गरजेचे अपेक्षित असताना गेली ११ महिने त्यावर कोणतीही हालचाल झालेली नव्हती.

फेब्रुवारी महिन्यामध्ये पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांच्यासोबत झालेल्या बैठकीनुसार सातारा आणि सांगली जिल्ह्यामधील पात्र खातेदारांचे प्रस्ताव जमीन वाटप व्हावी यासाठी आयुक्त कार्यालय मार्फत मंत्रालय स्तरावर पाठवून द्यावेत अशा स्पष्ट सूचना असतानाही सातारा जिल्ह्यातील एकूण अर्जांपैकी केवळ १४४ पात्र खातेदारांचे अर्ज आयुक्त कार्यालयामध्ये पाठवले गेले आहेत. परंतु सांगली जिल्ह्यामध्ये केलेल्या अर्जावर कोणतीही कार्यवाही पुनर्वसन सांगलीने केलेली नसल्यामुळे सांगली जिल्ह्यातील जमीन पसंतीचे अर्ज धुळखात पडलेले आहेत.

या मेळाव्याला धरणग्रस्त चळवळीचे नेते चैतन्य दळवी, सचिन कदम, सिताराम पवार, महेश शेलार, शिवाजी कांबळे, विनायक शेलार, राम कदम, डी के साळुंखे, राजाराम जाधव, दादू थोरवडे, साधू सपकाळ, किसन सुतार, श्रीपती माने,निवृत्ती सपकाळ,लक्ष्मण पवार , सुलेमान शिकारी,गजराबाई खराडे, कृष्णाबाई थोरवडे, आणि धरणग्रस्त उपस्थित होते.

### कोयना धरणग्रस्तांच्या दारी शासन केव्हा येणार ?

**राज्यभर शासन आपल्या दारी योजना राबवली जात आहे परंतु हे सामान्य जनतेचे सरकार आहे असे म्हणणारे मुख्यमंत्री हे स्वतः कोयना धरणग्रस्त असून देखील कोयना पुनर्वसनाचे प्रश्न जैसे थे आहेत. त्यामुळे शासन आपल्या दारी कार्यक्रम यशस्वी झालाय का आणि कोयना धरणग्रस्तांच्या दारी शासन कधी येणार असा प्रश्न धरणग्रस्त लोकांपुढे पडला आहे.**

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902



# सज्जनगडावरील बुरुजाची दगडे पावसाने निसटून पायऱ्यावर

सातारा : ऐतिहासिक सज्जनगड किल्ला हा सातारा शहरापासून अवघ्या पंधरा कि. मी. वर आहे. या मार्गावर जाणाऱ्या प्रमुख छ. शिवाजी महाराज महाद्वाराच्या उजव्या बाजूच्या बुरुजाची दगडे रविवारी रात्री सुरु पावसाने निसटून पायऱ्यावर खाली आली. दोन दिवस झाले तरीही ती दगडे तशीच आहेत. त्यामुळे प्रशासनाने ही बाब गांभीर्याने घ्यावी, अशी मागणी शिवप्रेमींमधून होत आहे.

सज्जनगड येथे दररोज भाविक तसेच पर्यटक भेट देतात. समर्थ रामदास स्वामी आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेला हा गड ओळखला जातो. या गडावर जाणाऱ्या मुख्य महादरवाजाच्या उजव्या बाजूच्या बुरुजाची दगडे सुरु असलेल्या पावसामुळे रविवारी रात्री ८.३० वाजता खाली आली. त्यावेळी जोरात आवाज मार्गावर झाला. सुदैवाने कोणीही तेथून जात नव्हते. गडावर आणि गडाच्या पायथ्यालाच थांबलेल्यांनी हा आवाज ऐकल्याचे सांगण्यात येते. सुरु असलेल्या पावसामुळे ही पडझाड झाली आहे. तसेच पार्किंगच्यावरील रस्त्यावरही मातीचा भराव ढासळला आहे. दोन दिवस झाले ढासळलेली दगडे तशीच रस्त्यात पडलेली आहेत. त्यामुळे त्या दगडाच्यावरुन ये-जा करावी लागते.

# ‘हुंबरळी’ पुनर्वसनाचा प्रश्न लवकरच मार्गी लावू

सातारा : पाटण तालुक्यातील हुंबरळी गावाचे २१ जुलै २०२१ रोजी ढगफुटी सदृश्य झालेल्या पावसाने भूस्खलन होऊन संपूर्ण गाव बाधित होऊनही गावाला कायमस्वरूपी पुनर्वसनापासून गेले तीन वर्ष वंचित राहावे लागले होते. याबाबत आज जिल्हाधिकारी जितेंद्र दुडी यांच्यासोबत झालेल्या बैठकीत जिल्हाधिकारी यांनी एका महिन्यात सर्व गावाचा पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावू सदर गावच्या कायमस्वरूपी पुनर्वसनाची जबाबदारी शासनाची आहे, असे सांगितले.



जिल्हाधिकारी जितेंद्र दूडी यांनी गेल्या चार वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न तात्काळ सोडविल्यामुळे ग्रामस्थांतून समाधान व्यक्त होत आहे.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी देविदास ताम्हाणे, पाटण तहसीलदार अनंत गुरव, गावचे अध्यक्ष नरेश देसाई व ग्रामस्थ उपस्थित होते.

२०२१ मध्ये झालेल्या भूस्खलनमध्ये हुंबरळी गावाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. यामध्ये तीन घरे जमीनदोस्त झाली होती तर संपूर्ण गाव बाधित झाले असताना हुंबरळी गावातील फक्त पाच घरांचे पुनर्वसन करण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. उर्वरित गावाला वगळण्यात आले होते. याबाबत ग्रामस्थांच्यावतीने तीन वर्षे प्रयत्न करण्यात येत होते, त्याला यश येत नव्हते म्हणून १५ ऑगस्ट रोजी बेमुदत आमरण उपोषण करण्यात आले होते. त्यावेळी उपविभागीय अधिकारी टोपे, तहसीलदार अनंत गुरव यांनी विनंती करून उपोषण मागे घेण्याबाबत विनंती केली करून जिल्हाधिकारी यांचे सोबत बैठक घेण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार आज जिल्हाधिकारी यांच्यासमवेत बैठक झाली त्यामध्ये जिल्हाधिकारी दुदी यांनी हुंबरळी गावातील २२७ कुटुंबाचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्याबाबत एक महिन्यात तत्काल निर्णय घेण्याचे मान्य केले. डूडी यांच्यासमवेत आज घेतलेल्या निर्णयाचे हुंबरळी ग्रामस्थ स्वागत केले असून असे कार्यतत्पर जिल्हाधिकारी आपल्या जिल्ह्याला मिळाले आहेत हे जिल्ह्याचे भाग्य आहे.

या बैठकीला हुंबरळी सरपंच सौ. रेश्मा कांबळे, रवींद्र देसाई, टी. एल. देसाई, बाजीराव देसाई, गणेश देसाई, भरत देसाई, बी. के. देसाई, लक्ष्मण देसाई, सीताराम देसाई, गोविंद चाळके, महेद्र देसाई, वाल्मीक देसाई, संजय देसाई, शिवाजी

# झेडपीसमोर युवाशक्ती ग्रामविकास संघटनेचे धरणे आंदोलन सुरू !

तातारा : ग्रामसेवकांना बायोमॅट्रीक प्रणाली जि.प.चे मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी सुरु करावी, या मागणीसाठी सातारा जिल्हा परिषद समोर महाराष्ट्र राज्य युवाशक्ती ग्रामविकास संघटनेच्यावतीने आंदोलन सुरू करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष इमरानभाई पठाण, जिल्हाध्यक्ष सुनील कदम यांनी दिली. दरम्यान, महाराष्ट्र राज्य या ग्रामविकासाशी निगडीत काम करत असलेल्या संघटनेच्यावतीने दि.६ जून २०२३ रोजी संपूर्ण राज्यभर प्रत्येक जिल्हा परिषद समोर आंदोलन करून ग्रामसेवकांना बायोमॅट्रीक प्रणाली लागु करावी, अशा आशयाचे निवेदन संबंधितांना देण्यात आलेले होते.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मंत्रालय स्तरावरून या मागणीची दखल घेऊन ग्रामविकास विभागाने दि.२४ ऑगस्ट २०२३ रोजी सर्व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र काढून ग्रामसेवकांना बायोमॅट्रीक प्रणाली लागु करावी, असे पत्र काढले होते. परंतु एक वर्ष पुर्ण होत आहे. तरीही सातारा जिल्हा परिषद कार्यकारी अधिकारी यांनी ग्रामसेवकांना सातारा जिल्हयात बायोमॅट्रीक प्रणाली लागु केलेली दिसुन येत नाही, म्हणजेच मंत्रालयीन आदेशाला केराची टोपली दाखवण्याचे काम केले आहे की काय? असा सवाल उपस्थित करत या वर्षपूर्तीच्या निमित्ताने झोपलेल्या प्रशासनाला जाग आणण्यासाठी धरणे आंदोलन होत आहे.. तेव्हा ग्रामसेवकांना बायोमॅट्रीक प्रणाली तात्काळ लागु करावी. तसेच ई ग्रामस्वराज अँप वर महिना संपल्यानंतर ३० दिवसाच्या आत ग्रामपंचायतची सर्व आर्थिक माहीती सक्तीने पुर्ण भरली जावी.

या मागणीकरता बायोमॅट्रीक प्रणाली आदेश वर्षपुर्ती सोहळा संबंधित अधिकारी यांचे अनोख्या पद्धतीने स्वागत करून अंतीम चर्चा करण्यात येणार आहे, अशी माहिती कदम यांनी दिली.यावेळी ड. विलास वहागावकर, अनिल वीर, विनोद ननावरे आदी उपस्थीत होते.




# भिमाई आंबेडकर स्मारकराचे काम गतीने करा

सातारा : महामाता भिमाई आंबेडकर यांच्या स्मारकाचे काम तात्काळ पूर्ण करावे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा, यासह अन्य मागण्यासाठी डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पार्टीचे प्रवक्ता अमर गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हलगी वाजवून चक्री उपोषण सुरु करण्यात आले आहे.

सदर बझार, सातारा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मातोश्री महामाता भिमाई आंबेडकर यांची समाधी आहे. याठिकाणी छोट्या शेड वजा इमारत होती. त्याठिकाणी शेड काढून इमारतीचे काम सुरु करण्यात आले. मात्र, ते संथगतीने सुरु असताना आता बंद आहे.

याबाबत आर्थिक अडचणी असल्याने शासनाने सदरची जागा ताब्यात घेऊन भिमाई स्मारक उभारावे व त्याचे लोकार्पण करावे.

सातारा या ऐतिहासिक शहर हे महात्मा जोतीराव फुले यांची कुलभूमी असून शहरात अद्याप महात्मा फुले व बहुजन उध्दारक लोकराजा राजश्री छत्रपती शाहू महाराज या दोन महामानवाचे पूर्णाकृती पुतळे बसवण्यात यावेत. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा. महाराष्ट्र भूषण शाहीर पुंडलिक यांचे स्मारक शहरात उभारावे,या मागण्यासाठी चक्री उपोषण सुरु करण्यात आले आहे. यावेळी रावण गायकवाड, प्रा. अरुण गाडे, प्रा. खराडे, अनिल वीर, विलास वाहगावकर, श्रीरंग रणदिवे, अविनाश तुपे उपस्थित होते.

# ज्ञानाधिष्ठित समाज निर्मितीसाठी चंद्रहार पाटील यांच्या तत्वांची गरज : अरविंद येलपले



वर्धनगड : सध्याचे युग हे गतिमान असून विविध क्षेत्रात सातत्याने स्पर्धा पहावयास मिळते आहे. वर्तमान पिढी सोशल मीडियाच्या अधिक विळख्यात अडकताना दिसून येत. समाजात विकृत मानसिकता वाढते आहे ही अतिशय गंभीर बाब असून ज्ञान, सत्यशोधक भूमिका, मानवता, करुणा, सहानुभव, चारित्र्य या मूल्यांच्या रुजवणुकीकरिता आपले समर्पित भावनेने जीवन जगलेले चंद्रहार पाटील यांच्या विचारांची व तत्वांची समाजाला गरज असल्याचे प्रतिपादन प्राचार्य अरविंद येलपले यांनी केले.

चंद्रहार पाटील ग्रामीण शिक्षण संस्था खटावचे संस्थापक माजी आमदार कै चंद्रहार पाटील यांच्या ९१ व्या जयंती समारंभाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सेवानिवृत्त प्रा डॉ एस ए जाधव,प्रा डॉ यू आर जाधव,,प्रा आर बी पवार,प्रा आर के साखरे, प्रा एस वाय फडतरे, प्रा एल ए काझी,,प्रा डॉ पी डी कुलकर्णी, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा के बी जाधव,प्रा डॉ जे पी कदम,प्रा आर एन खराडे,प्रा डॉ बी बी राठोड कार्यालयीन अधीक्षक के सी इनामदार,माजी विद्यार्थी,प्राध्यापक प्राध्यापिका ,प्रशासकीय कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी प्रा.डॉ. उदय जाधव यांनी दादांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा सविस्तरपणे आढावा घेत आठवणींना उजाळा दिला तर पी.डी. कुलकर्णी यांनी दादांच्या विचारांचा आदर्श पुढे चालू ठेवणे आवश्यक असल्याचे सांगितले.

मराठी विभागप्रमुख डॉ. जे. पी. कदम यांनी प्रास्ताविक तर प्रा के बी जाधव यांनी आभार मानले. डॉ बी.बी राठोड यांनी सूत्रसंचालन केले.

# ध्वनी प्रदूषणावर संबंधित अधिकाऱ्यांनी सात दिवसात उत्तर द्यावे

## सुशांत मोरे यांची नोटीशीव्दारे मागणी

सातारा : महाराष्ट्रात अनेक सण, उत्सव, महापुरुष यांच्या जयंती निमित्त सार्वजनिक आरोग्य आणि ध्वनी प्रदूषणांमुळे नागरिकांवर गंभीर परिणाम होतात. दरवर्षी कार्यवाही करण्याचे आश्वासन संबंधित विभाग आणि अधिकाऱ्यांकडून दिले जाते,परंतु ठोस कारवाई होत नाही. त्यामुळे सामाजिक, माहिती अधिकार, पर्यावरण कार्यकर्ते सुशांत मोरे यांनी पोलिस महासंचालक, जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षक, प्रदुषण नियंत्रण मंडळ इ. विविध विभागाच्या अधिकाऱ्यांना कायदेशीर नोटीस पाठवली असून याबाबत उपाययोजना, कारवाई यासंदर्भात सात दिवसात उत्तर देण्याची मागणी केली आहे. अन्यथा हरित लवाद कडे दाद मागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नोटीसीत जी महाराष्ट्रातील सणांदरम्यान वाढत असलेल्या ध्वनी प्रदूषणावर त्वरित कार्यवाही करण्याची विनंती करण्यात आली आहे. विविध सणांदरम्यान याप्रकारच्या प्रक्रियांमध्ये वापरले जाणारे उच्च डेसिबल ध्वनी प्रणालींचा सततचा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. या उपकरणांमुळे निवासीय शांततेचा भंग होतो आणि गंभीर आरोग्य धोके निर्माण होतात. श्री. मोरेच्या तक्रारीमध्ये, हियरिंग इम्पेयरमेंट, वाढलेला ताण आणि पूर्वीच्या आरोग्य स्थिती असलेल्या व्यक्तींवर होणारे दुष्परिणाम यांचा उल्लेख करण्यात आला आहे. सार्वजनिक चर्चा आणि मीडिया कवरेज असूनही संबंधित अधिकाऱ्यांनी विद्यमान ध्वनी प्रदूषण नियमांचे पालन करण्यासाठी प्रभावी कारवाई केली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. डॉ. महेश विजय बेडेकर बनाम महाराष्ट्र राज्य यांच्यातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा उल्लेख केला आहे, जो ध्वनी प्रदूषणाच्या गंभीर परिणामांवर आणि अधिकाऱ्यांच्या पर्यावरणीय संरक्षणाच्या कायदेशीर जबाबदारीवर प्रकाश टाकतो. पर्यावरण संरक्षण अधिनियमामध्ये ध्वनीला पर्यावरणीय प्रदूषक म्हणून समाविष्ट केले आहे,आणि २००० मध्ये केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालयाने जारी केलेले ध्वनी प्रदूषण (नियमन आणि नियंत्रण) नियम यामध्ये ध्वनी पातळीसाठी कठोर मानकांचा निर्धार केला आहे.

या नोटीसीत हे नियम सणांदरम्यान अनेकदा पाळले जात नाहीत आणि रात्रीच्या वेळेला ध्वनी पातळी १०० डेसिबल्सपेक्षा अधिक होते, जी परवानगी दिलेल्या मर्यादेपेक्षा खूपच जास्त असते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पोलिस विभाग कायद्याची अंमलबजावणी करत नसल्याने त्वरित आणि कडक कारवाईची मागणी श्री. मोरे यांनी केली आहे. मॉनिटरिंग टीम्सची तैनाती, सूचना जारी करणे आणि नियमभंग करणाऱ्यांवर दंड लागू करण्याची आवश्यकता असल्याचे श्री. मोरे यांनी नोटीसीत म्हटले आहे. अत्याधुनिक डेसिबल ध्वनी प्रणालींशी संबंधित लेझर लाइट्सचा वापर, जो तात्पुरता किंवा कायमचा अंधत्व निर्माण करणाऱ्या धोक्यांची चिंता, देखील नोटीसीत व्यक्त करण्यात आली आहे. या धोक्यांना त्वरित उपाययोजना करण्याची मागणीही श्री. मोरे यांनी केली आहे.

गणेशोत्सव जवळ येत असल्यामुळे, नोटीसीत संबंधित अधिकाऱ्यांना ७ दिवसांत उत्तर देण्याची मागणी केली आहे. जर कारवाई केली गेली नाही तर योग्य कायदेशीर मार्गाने हरित लवाद कडे न्याय मिळवण्यासाठी, कोणतीही निष्क्रियता झाल्यास अधिकाऱ्यांना ध्वनी प्रदूषणामुळे होणाऱ्या संभाव्य दुष्परिणामांसाठी जबाबदार ठरवले जाऊ शकते असा इशाराही श्री. मोरे यांचेवतीने ड. त्रूनाल टोणपे, ड. निकिता आनंदाचे, ड. ओंकार रासकर यांनी नोटीसीत दिला आहे. सांस्कृतिक सणांची आणि सार्वजनिक आरोग्य व पर्यावरणीय चिंतांची संतुलन साधण्यासाठी प्रभावी नियमावली आणि सार्वजनिक जागरूकतेच्या आवश्यकता लक्षात घेऊन ही नोटीस दिल्याचेही श्री. मोरे यांनी सांगितले.

## कारी येथील युवक बेपत्ता

**सातारा :** सातारा तालुक्यातील कारी येथील युवक बेपत्ता झाला आहे. जिवन सुदाम शिंदे (वय २७) असे त्याचे नाव आहे. याबाबत सुदाम धोंडीबा शिंदे (रा. कारी, ता. सातारा) असे त्याचे नाव आहे. याबाबतचा अधिक तपास सहायक फौजदार वायदंडे करत आहेत.

## मुलीच्या मेसेजच्या कारणावरुन एकाला मारहाण

**सातारा :** मुलीला मेसेज का करतोस या कारणावरून येथील गोडोली परिसरात एकाला मारहाण केल्याप्रकरणी तिघांवर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अजय आनंदराव शिंदे (रा. पाली, ता. कऱ्हाड), शुभम रोकडे (रा. कोडोली) व चेतन यादव (रा. कोडोली) असे त्याचे नाव आहे. याबाबत सुरज आनंदराव शिंदे (वय २२, रा. पाली, ता. कऱ्हाड) याने फर्यािद दिली आहे. याबाबतचा अधिक तपास हवालदार जाधव करत आहेत.

## नागेवाडी येथे पादचाऱ्यास कारची धडक

**सातारा :** नागेवाडी (ता. सातारा) येथे पादचाऱ्यास कारची धडक देऊन जखमी केल्याप्रकरणी एकावर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ऋषीकेश विजय दाणेकर (रा. मिरज रोड, सांगली) असे त्याचे नाव आहे. याबाबत प्रथमेश दत्तात्रय गुरव (रा. नागेवाडी) यांनी फर्यािद दिली आहे. दाणेकर यांच्या कारने दिलेल्या धडकेत ज्ञानदेव बाबुराव गुरव (वय ७२, रा. नागेवाडी) हे जखमी झाले आहेत. याबाबतचा अधिक तपास हवालदार वायदंडे करत आहेत.

# दरेवाडी गाव आ. मकरंद पाटील यांच्या बरोबरच;आबांना मताधिक्य देणार

## स्वत:च्या राजकीय स्वार्थासाठी कुणीही गावास वेठीस धरू नये ग्रामस्थांचा इशारा

बावधन : दरेवाडी गावाला निष्ठेचा वारसा आहे.आजवरच्या पदाधिकाऱ्यांनी तो कायम जपला आहे.आम्ही मागील विधानसभेत मकरंद पाटील यांना मतदान केले होते,त्यामुळे आम्ही त्यांच्याबरोबरच राहणार आहोत.काहीजण स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी दरेवाडी गावाचा दुसऱ्या पक्षात असल्याचा दावा करीत असले तरीही दरेवाडी गाव आजही आ.मकरंद पाटील यांच्या पाठीशी ठाम असल्याचे स्पष्टोक्ती दरेवाडी ग्रामस्थांनी आ.मकरंद पाटील यांच्यासमोर दिली.

येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत दरेवाडी गाव शरद पवार राष्ट्रवादी बरोबर राहणार असल्याचा बातम्या प्रसारमाध्यमात प्रसिद्ध झाल्या होत्या.यावरून दरेवाडी ग्रामस्थांनी तातडीने आ मकरंद पाटील यांची भेट घेऊन आम्ही तुमची साथ सोडणार नसल्याचे स्पष्ट केले.आम्ही विधानसभेत आ.मकरंद पाटील यांनाच मतदान केले होते.त्यांनी आमच्या गावात,परिसरात विकासाची गंगा आणली आहे. स्व.मदनराव पिसाळ यांनी पाठिंबा दिलेल्या युती सरकारच्या काळात उभारलेल्या नागेवाडी धरणाच्या कालव्याच्या प्रश्न मार्गी लावून बावधन परिसरातील शेती पाण्याचा प्रश्न सोडला आहे.आर्थिक गर्तेत सापडुन बंद पडलेला किसनवीर साखर कारखाना पुन्हा सुरू करून आ.पाटील यांनी शेतकरी बांधवांच्या ऊसाचा प्रश्न सोडवला आहे.तसेच आबांच्या माध्यमातून कणुर-दरेवाडी डांबर रस्ता,गावामधील अंतर्गत सिमेंट व डांबर रस्ते ,ओढ्यावर सिमेंट बंधारा,पाणीपुरवठा योजना ,ओढ्यावरील पूल अशी बरीच विकासाची कामे झाली आहेत.

आ.मकरंद पाटील यांच्या नेतृत्वावर आमचा पूर्ण विश्वास असून त्यांनी अडचणीतील साखर कारखाना वाचविण्यासाठी महायुती सरकारबरोबर राहण्याचा निर्णय आम्हाला मान्य आहे.आबांच्या याच निर्णयामुळे आपला शेतकऱ्यांच्या मालकीचा साखर कारखाना आपण वाचवू शकल्याची जाणीव आम्हा दरेवाडीकरांना आहे.

आम्ही काहीही झाले तरी आमच्या सुखदुः खात कायम सहभागी असणाऱ्या आमच्या आमदारांची साथ सोडणार नसून यावेळी मागच्या वेळी पेक्षा जास्त मताधिक्य देऊन आ.मकरंद पाटील यांना पुन्हा निवडुन आणणार असल्याचेही यावेळी दरेवाडी ग्रामस्थांनी ठासून सांगितले.

यावेळी आ.मकरंद पाटील यांनी दरेवाडी ग्रामस्थांच्या भावना जाणून घेतल्या.युवानेते विक्रम पाटील यांनी तीव्र शब्दांत 'जशास तसे' उत्तर देण्याच्या विरोधकांच्या दाव्याची खिल्ली उडवली.प्रणित पाटील यांनी आम्ही आ.मकरंद पाटील यांच्या माध्यमातून 'एकच ध्यास परिसराचा सर्वांगीण विकास' हे एकमेव सूत्र घेऊन कार्यरत असून विकासाच्या आड येणाऱ्या प्रवृत्तीला यापुढे तीव्र विरोध करणार असल्याचे स्पष्ट केले.



यावेळी तालुका खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष मदन भोसले,संचालक हरिदास राजपुरे,नितीन मांढरे, प्रवीण मतकर,कणुर ग्रामपंचायतीचे सरपंच निखिल राजपुरे,दरेवाडीचे माजी सरपंच भानुदास साळुंखे, ग्रामपंचायत सदस्य,नवनाथ राजपुरे,ग्रामपंचायत सदस्य,विजय साळुंखे सोसायटी चेअरमन,रमेश राजपुरे,सुरेश राजपुरे,विश्वास साळुंखे,दिलीप राजपुरे,पोपट राजपुरे,संभाजी राजपुरे,सुधीर राजपुरे,विलास राजपुरे,संदीप राजपुरे,नामदेव चौधरी,सूरज साळुंखे,राम राजपुरे,अंकुश थोपटे,शांताराम राजपुरे,आत्माराम राजपुरे,रोहित साळुंखे,सुरज राजपुरे,किरण साळुंखे,राहुल थोपटे,प्रथमेश साळुंखे,साहिल राजपुरे,ओंकार राजपुरे,पप्पू राजपुरे,संदीप राजपुरे,प्रविण साळुंखे,नितेश राजपुरे,अमोल राजपुरे,अनिश राजपुरे,आदित्य राजपुरे,मानसिंग साळूंखे यांच्यासह दरेवाडी गावातील सक्षम कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवछत्रपतींच्या अपमानाविरोधात कोल्हापुरात शिवसेना अन् राष्ट्रवादीचं आंदोलन



**कोल्हापूर :** सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण इथं नौदल दिनानिमित्त डिसेंबर महिन्यात छत्रपती शिवरायांचा पूर्णाकृती पुतळा बसवण्यात आला होता. या पुतळ्याचं लोकार्पण चार डिसेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत करण्यात आलं होतं. मात्र अवघ्या आठ महिन्यात हा पुतळा सोमवारी कोसळला. या घटनेचे पडसाद राज्यात उमटलेत. पुतळा कोसळल्यानं या कामाच्या दर्जा विषयी शंका उपस्थित करत महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी शिवछत्रपतींच्या पुतळ्याच्या अपमानाविरोधात सरकार विरोधात हल्लाबोल केला.

आज कोल्हापुरात शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीनं छत्रपती शिवाजी महाराज चौकात राज्य सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करत निदर्शनं करण्यात आलीत. तसंच यावेळी महायुतीचे काळे कारनामे अशा आशयाचे फलक हातात घेऊन कार्यकर्ते सहभागी झाले होते.

शिवसेना शहरप्रमुख रविकिरण इंगवले यांनी, हा पुतळा उभारणीत कोल्हापूरचं कनेक्शन असल्याचं आरोप करत छत्रपती शिवरायांच्या पुतळा उभारणीतही सत्ताधारी पक्षातील नेत्यांनी स्वतःचा स्वार्थ बघितला असल्याचा आरोप केलाय.

या आंदोलनात उपनेते संजय पवार, विजय देवणे, सुनील मोदी, विशाल देवकुळे, मनजीत माने, राजू यादव, जिल्हाध्यक्ष व्ही. बी. पाटील शहराध्यक्ष आर के पोवार, महेश जाधव, गणेश जाधव यांच्यासह कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# तासगावात वाहून गेलेले जोडपे सातारा जिल्ह्यातील



**तासगाव :** तासगाव हद्दीत येरळा नदीच्या पुलावरून सोमवारी दुपारी वाहून गेलेले जोडपे सातारा जिल्ह्यातील पिंपोडे बुद्रुक (ता. कोरेगाव) गावचे असल्याचे निष्पन्न झाले आहे. आईचा मृत्यू झाल्यानंतर अंत्यविधीसाठी रेखा दत्तात्रय पवार(वय ४४) या पती दत्तात्रय उत्तम पवार(वय ५२) यांच्यासोबत शनिवारी तासगावला आल्या होत्या. अंत्यविधीनंतरचे सर्व विधी करून माघारी पिंपोडे बुद्रुकला जात असताना येरळा नदीच्या पुलावरून वाहून गेले. एनडीआरपीच्या पथकाकडून सलग दुसऱ्या दिवशी शोध मोहीम सुरू होती. मात्र अद्याप तपास लागला नाही.

सातारा जिल्ह्यातील पिंपोडे बुद्रुक येथील रेखा पवार यांचे तासगाव येथे आई-वडील वास्तव्यास होते. आईचा मृत्यू झाल्यानंतर रेखा पवार पती दत्तात्रय पवार यांच्या सोबत शनिवारी तासगावला आल्या होत्या. अंत्यसंस्कारानंतरचे सर्व विधी झाल्यानंतर सोमवारी दोघे पती-पत्नी पिंपोडे बुद्रुकला निघाले होते. जुना सातारा रस्त्यावर तासगाव ते तुरचीच्या दरम्यान असलेल्या येरळा नदीवरील पुलावर गेल्या काही दिवसांपासून पाणी वाहत आहे. प्रशासनाकडून हा रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. मात्र त्या ठिकाणाहून सोमवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास पवार दाम्पत्य तुरचीच्या दिशेने निघाले होते. तिथे उपस्थित असलेल्या काही तरुणांनी पुलावरून पाणी वाहत असल्यामुळे जाऊ नका, अशी विनंती केली होती. मात्र तरीही दुचाकीवरून हे दांपत्य पुलावर गेले. पुलावरून वेगाने पाणी वाहत असल्यामुळे, तोल जाऊन दुचाकीसह दोघेही नदीच्या प्रवाहात कोसळले. त्यानंतर तिथे उपस्थित असणाऱ्या तरुणांनी याबाबतची माहिती पोलिसांना दिली.

पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली एनडीआरएफच्या पथकाला पाचरण केले. काल रात्री उशिरापर्यंत पथकाकडून शोध मोहीम सुरू होती. मात्र तपास लागला नाही. मंगळवारी सकाळी पुन्हा एनडीआरएफच्या पथकाकडून शोधमोहीम राबवण्यात आली.

दिवसभर शोधमोहीम सुरू होती. तरीही तपास लागू शकला नाही. यावेळी पोलीस अधिकाऱ्यांसह पवार दांपत्याच्या मुलांनी आणि नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली होती.

रेखा पवार यांच्या आईचे सोमवारी रक्षाविसर्जनसह सर्व अंत्यसंस्कारानंतरचे विधी पार पडले. त्यानंतर लेक आणि जावई स्वतःच्या गावी निघाले. मात्र गावी निघाले असतानाच त्यांच्या बाबतीत दुर्घटना घडली. त्यामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत होती.

तासगाव पोलिसात बेपत्ता असल्याची नोंद - सोमवारी गावाकडे येण्यासाठी निघालेले आई-वडील रात्री उशिरापर्यंत गावी न आल्याने आणि त्यांचा मोबाईल लागत नसल्याने, पवार दांपत्याचा मुलगा योगेश दत्तात्रय पवार यांनी आई-वडील बेपत्ता असल्याची नोंद पोलिसात केली आहे.

# हातकणंगले विधानसभा राखीव मतदार संघातून विजयासाठी बांधला चंग

**शिरोळ :** आगामी विधानसभा निवडणूक जिंकायचीच हे ध्येय नजरेसमोर ठेवून हातकणंगले विधानसभा राखीव मतदार संघातून लढवून विजय मिळवायचाच असा चंग दे.भ. रत्नाप्पाण्णा कुंभार शिरोळ मागासवर्गीय सूतगिरणीचे चेअरमन आणि दलितमित्र अशोकराव माने यांनी बांधला असून कोणत्याही परिस्थितीत विजय हातकणंगले राखीव विधानसभा मतदारसंघातून खेचून आणायचा असे ध्येय उराशी बाळगून डॉ अशोकराव माने यांच्या कार्यकर्त्यांनी भक्कम अशी मोर्चे बांधणी सुरू केली आहे. . यामुळे हा मतदारसंघ पिंजून काढण्यास माने यांनी सुरुवात केली आहे. सार्वजनिक कार्यक्रमांना उपस्थिती बरोबर वैयक्तिक गाठीभेटी त्यांनी जोर केला आहे

या मतदारसंघाचे माजी मंत्री, माजी खासदार जयवंतराव आवळे यांनी बरेच वर्षे प्रतिनिधित्व केले आहे. यानंतर राजीव आवळे, डॉ. सुजित मिणचेकर आणि आता आम. राजूबाबा आवळे प्रतिनिधित्व करत आहेत. पूर्वाश्रमीचा काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या या मतदारसंघात मध्यंतरीच्या काळात जनसुराज्य शक्ती पक्षाच्या पाठबळावर राजीव आवळे यांनी प्रतिनिधित्व केले. यानंतर डॉ. सुजित मिणचेकर यांनी शिवसेनेच्या वतीने दोन टर्म प्रतिनिधित्व केले. सध्या या मतदार संघाचे काँग्रेसचे आम. राजूबाबा आवळे हे प्रतिनिधित्व करीत आहेत.

लोकसभा संपते न संपते तोच विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक उमेदवार आपापल्या मतदारसंघात चाचपणी करू लागला आहे. विधानसभा जिंकायचीच या ध्येयाने शिरोळ तालुक्यातील रहिवासी असलेले दलितमित्र डॉ. अशोकराव माने यांनी हातकणंगले राखीव मतदार संघावर आपले लक्ष केंद्रित ठेवून विविध विकास कामांचा सपाटा लावला आहे . २०१९ च्या निवडणुकीत त्यांनी जनसुराज्य भाजप पक्षाच्या संयुक्त युतीतून ही निवडणूक लढवली होती. त्यामुळे त्यांना जनसुराज्य शक्ती पक्षाचे संस्थापक आणि वारणा सहकारी साखर कारखान्याचे प्रमुख आम. विनय कोरे यांची साथ लाभणार आहे.

डॉ. माने यांनी गेल्या पाच वर्षांपासून या मतदारसंघातील गाव आणि गाव पिंजून काढले आहे. तेथे होणाऱ्या विविध सार्वजनिक कार्यक्रमांना आवर्जून हजेरी लावत आहेत. तसेच शासनाच्या विविध योजनांमधून प्रत्येक गावात निधी आणून विकास साधण्याचा प्रयत्न ते करत आहेत . या निधी उपलब्धतेसाठी जनसुराज्य शक्ती पक्षाचे नेते आम. कोरे यांचे त्यांना पाठबळ लाभले आहे. आम. कोरे यांचे प्राबल्य आणि वारणा कारखान्याचे कार्यक्षेत्र असलेल्या या मतदारसंघात माने सध्या प्रत्येकाच्या मनात घर करू लागले आहेत. गावागावात होणाऱ्या विविध कामात ते हिरीरीने सहभाग घेत आहेत.

# श्री गुरुदत्त पतसंस्थेची पाचवी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

**कुरुंदवाड :** कुरुंदवाड येथील अल्पावधीत आर्थिक प्रगती पथावर असलेल्या श्री गुरुदत्त पतसंस्थेची पाचवी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत २५ ऑगस्ट रविवारी संपन्न झाली सभेच्या अध्यक्षस्थानी चेअरमन विलास पाटील हे होते तर ज्येष्ठ संचालक रामचंद्र मोहिते चंद्रकांत जोग यांची उपस्थिती होती यावेळी १२% डिव्हिडंट जाहीर करण्यात आला

मयत मान्यवरांना यासीन पैलवान यांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. दिप प्रज्वलन करून श्री दत्त महाराजांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे आधारस्तंभ चंद्रकांत जोंग व रामचंद्र मोहिते यांच्या हस्ते करण्यात आले. स्वागत प्रास्ताविक रविकिरण गायकवाड यांनी केले.

अहवाल सालातील आढावा व अहवालाचे वाचन संस्थेचे चेअरमन विलास पाटील यांनी केले यावेळी बोलताना ते म्हणाले अल्पावधीमध्ये संस्था यशो शिखरावर असून यासाठी संस्थेचे पदाधिकारी, सभासद, ठेवीदार कर्जदार, कर्मचारी व हितचिंतक यांचे सहकार्य लाभले आहे. सामान्यांचे आर्थिक पथ वाढवण्यासाठी ही पतसंस्था स्थापन करण्यात आली आहे. या पतसंस्थेमध्ये गरीब वंचितनां विना अट तात्काळ कर्ज देण्यात येते. या अहवाल सालामध्ये सभासदांना १२% डिव्हिडंट देण्याचे जाहीर करण्यात आले. संस्थेला प्रगतीपथावर नेण्यासाठी सर्वांनी यापुढे असेच सहकार्य ठेवावे असे चेअरमन विलास पाटील म्हणाले. विषय पत्रिकेचे वाचन संस्थेचे सचिव मिलिंद सूर्यवंशी यांनी केले यावेळी उपस्थित सभासदांनी सर्व विषय एकमताने मंजूर केले. सभेमध्ये चंद्रकांत जोंग, रामचंद्र मोहिते, सुनील पाटील, तेजस कोळेकर आदीने आपली मनोगते यावेळी व्यक्त केली. या संस्थेचे ८७९ इतके सभासद आहेत. भाग भांडवल ४१ लाख ३६ हजार इतके आहे. ठेवी १० कोटी पूर्ण झाल्या असून २५ कोटी ठेवी कडे वाटचाल सुरू आहे. सभासदांना कर्जे १ कोटी ४५ लाख ४२ हजार इतकी वाटप करण्यात आली आहेत. पतसंस्थेची शंभर टक्के कर्ज वसुली आहे. तर निव्वळ नफा ५ लाख ९९ हजार ९०१ रुपये इतका आहे. अहवाल सालामध्ये ऑडिट वर्ग अ दिलेला आहे. यावेळी संस्थेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते शेवटी आभार आनंदा पवार यांनी मानले. जी डी चव्हाण, किरण दळवी, सचिन मोहिते, गजानन पाटील, सुनील पाटील, जितेंद्र चव्हाण, प्रिया पवार, रंजना गायकवाड उपस्थित होते.

# कोल्हापुरात महिलेच्या गळ्यातील सहा तोळे वजनाचे दागिने लंपास

**कोल्हापूर :** चौथ्या श्रावण सोमवार निमित्त काढण्यात आलेल्या रेणुका देवीच्या मानाच्या जगांच्या मिरवणुकी दरम्यान एका महिलेच्या गळ्यातील सहा तोळे वजनाचे दागिने अज्ञात चोरट्याने लंपास केले. या प्रकरणी मंगल काळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून लक्ष्मीपुरी पोलिसात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असुन पोलीस अधिक तपास करत आहेत.

# राजकोट किल्ल्यावरील शिवपुतळा दुर्घटनेबाबत पाटण येथे शिवप्रेमींच्यात संताप

## संभाजी ब्रिगेडची संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी

**पाटण:-** सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजकोट किल्ल्यावरील नुकताच आठ महिन्यांपूर्वी नव्याने उभारलेला छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा सोमवारी वाऱ्याच्या वेगाने कोसळल्याने राज्यासह देशभरात शिवप्रेमींच्यात संताप व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर पाटण येथे संभाजी ब्रिगेड, सुंदरगड (दातेगड) संवर्धन समिती, सकल मराठा क्रांती मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी जाहीर निषेध व्यक्त केला. पाटण तालुका संभाजी ब्रिगेडच्या वतीने या घटनेच्या निषेधाचे निवेदन पाटण तहसिल कार्यालयाच्या नायब तहसिलदार सौ. दर्शना सुर्यवंशी यांना देण्यात आले.




या निवेदनात संभाजी ब्रिगेडने असे म्हणले आहे. ४ डिसेंबर २०२३ रोजी नौदल दिनाच्या निमित्ताने मोठा गाजावाजा करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले होते. अवघ्या आठ महिन्यांच्या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज यांचा हा पुतळा कोसळल्यामुळे तमाम शिवप्रेमी संतप्त झाले आहेत. केवळ निकृष्ट बांधकामामुळे हा पुतळा पडला आहे. शिवपुतळा परिसराच्या सुशोभीकरणासाठी आणि इतर व्यवस्थेसाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग कणकवली व पुतळा घडविणारे मुर्तीकार हे जबाबदार असून सदर घटनेची चौकशी करून संबंधितांवर दखलपात्र गुन्हा दाखल करुन कठोर कारवाई करण्यात यावी. अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी संभाजी ब्रिगेडचे पाटण तालुका अध्यक्ष नितीनभिसे नाईक, उपाध्यक्ष अरविंद कदम, पाटण शहर अध्यक्ष गणेश जाधव, मंगेश चव्हाण, रुपेश माने हे उपस्थित होते.

# हिंदुत्ववादी संघटनांच्यावतीने जन आक्रोश मोर्चा

**भोर :** भोरमध्ये हिंदुत्ववादी संघटनांच्या वतीने देशभरात होत असलेल्या हिंदू मुलींवरील आत्यचाराच्या विरोधात मिलिंद एकबोटे यांच्या नेतृत्वाखाली सोमवार (दि.२६) रोजी जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

सोमवार (दि.२६) रोजी सकाळी ११ वाजता चौपाटी परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्या ला पुष्पहार घालून मोर्चा चा प्रारंभ करुन मंगळवार पेठ मार्गे राजवाडा चौकात समारोप करण्यात आला. यावेळी हातात भगवे झेंडे आणि हिंदूवरील आत्याचाराच्या निषेधार्थ घोषणांचे फलक घेत घोषणा बाजी करण्यात आली.

यावेळी मिलिंद एकबोटे, यशवंत डाळ, विनायक सनस, सोमनाथ ढवळे, युवराज जेधे, संजय भेलके, अतुल काकडे, आप्पा मळेकर, अमर बुदगुडे, पल्लवी फडणीस, विकास बांदल, राजेंद्र गुरव,नितीन सोनावले यांच्यासह शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते.

यावेळी हिंदू मुलींची हत्या करणाऱ्या आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी अशा आशयाचे निवेदन भोरचे तहसीलदार राजेंद्र नजन यांना देण्यात आले. दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी भोर पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक आण्णा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पाच अधिकारी व सुमारे पंचवीस पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त केला.

# दिव्यांगांचं जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अर्धनग्न आंदोलन



**कोल्हापूर :** दिव्यांग बांधवांनी त्यांच्या विविध मागण्यांसाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अर्धनग्न आंदोलन केले. गेली अनेक वर्ष मागणी करूनही शासनाचं याकडं दुर्लक्ष होत असल्यामुळं ऐन पावसात या दिव्यांग बांधवांनी अर्ध नग्न आंदोलन करत शासनाचं लक्ष वेधले...

हातकणंगले तालुक्यातील भादोले इथल्या दिव्यांग बांधवांनी व्यवसाय करण्यासाठी आणि राहण्यासाठी जागा मिळावी, अशी मागणी केलीय. गेल्या पाच वर्षांहून अधिक काळ यासाठी पाठपुरावा सुरु असला तरी अद्याप दिव्यांगांची ही मागणी पूर्ण झालेली नाही. शासन स्तरावरील बैठका, चौकशी अहवाल यामध्ये वेळ काढूपणा सुरुय. 'शासन दिव्यांगांच्या दारी' या सारखे उपक्रम केवळ फार्स असून यातून दिव्यांगांच्या प्रश्नांची सोडवणूक होत असून एक हात मदतीचा दिव्यांगांच्या कल्याणाचा या सारख्या योजना कागदोपत्री राबवून दिव्यांगांची दिशाभूल केली जात असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

या आंदोलनात तुकाराम पाटील, शहाजी धनवडे, अशोक इंगवले, उदय तळेकर, लता पाटील, पद्मिनी कुंभार यांच्यासह दिव्यांग बांधव मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.





**आल्या आल्या गौरी सोन्या रुपयाच्या पावलांनी..** सप्टेंबर महिन्यात सात तारखेपासून सुरू होणाऱ्या घरगुती आणि सार्वजनिक गणेशोत्सवाची लगबग आता सातारा जिल्ह्यात दिसू लागली आहे. गणपतीच्या बहिणी अर्थात ज्येष्ठा गौरी आणि कनिष्ठा गौरींचे आगमन १० सप्टेंबरला होत आहे .यासाठी महिला वर्गामध्ये विशेष उत्साह दिसत असून सातारा शहरातील विविध प्रसाधन स्टॉलवर या गौरींचे आकर्षक मुखवटे त्यांच्या सजावटीसाठी लागणारे साहित्य साडी व साज शृंगार करून नेसवलेल्या तयार गौरींचे पुतळे तसेच फेटा घातलेल्या गौरींचे मुखवटे ही पाहायला मिळत आहेत. (छाया : अतुल देशपांडे, सातारा.)